# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२३-२४/१५३

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२३-२४ मधील दिनांक १७ ऑगस्ट २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार दिनांक १७ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री ०८:३० वाजता हायब्रीड माध्यमाने सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | प्रा. सुनिल भिरूड ( प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे क्र. संकीर्ण - २०२३/ प्र.क्र.११६/विशि-५ दिनांक १७/०८/२०२३ च्या पत्राबाबत. | निवडणूक विभाग |
| ठराव | मा. कुलसचिवांनी पदवीधर अधिसभा निवडणुका संदर्भात वेगवेगळ्या टप्प्यातील निर्णयासंबंधी माहिती दिली. विद्यापीठाने दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ रोजी नोंदणीकृत पदवीधरांची अंतिम मतदार यादी (सुधारित) व निवडणूक अधिसुचना प्रसिद्ध केली होती.<br>तथापि, उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, मुंबई यांच्याकडून नोंदणीकृत पदवीधर अधिसभा निवडणूक | |

मतदार अंतिम यादी संदर्भात "मा. आमदार ॲड. आशिष शेलार यांनी संदर्भाधीन पत्रामध्ये मुंबई विद्यापीठ पदवीधर अधिसभा निवडणुकीच्या प्राथमिक यादी मध्ये विसंगती असल्याबाबत पत्राद्वारे निदर्शनास आणले असून, सदर विषयांची चौकशी करेपर्यंत सिनेट निवडणुका कार्यक्रम जाहीर करू नये अशी विनंती केली आहे.

या अनुषंगाने शासनाने प्रस्तुत प्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करून सविस्तर अहवाल तातडीने आजच शासनास सादर करण्यात यावा." असे कळविले आहे.

तथापि, शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या बाबींचा विचार करता मतदार यादीतील सर्व मतदारांची तपासणी करणे एका दिवसात शक्य होणार नाही. तरी याबाबत योग्य ती सखोल चौकशी करण्यासाठी विद्यापीठास वेळ आवश्यक आहे. तसेच निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलेली असून त्यानुसार निवडणूक प्रक्रिया सुरु झालेली असल्यामुळे त्या अनुषंगाने पुढील निवडणूक प्रक्रिया चालू ठेवावी किंवा कसे या संदर्भात शासनाकडून विद्यापीठास मार्गदर्शन करावे अशी विनंती केली आहे.

उपरोक्त विद्यापीठाच्या पत्रावर शासनाकडून श्री. अजित बाविस्कर, उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण - २०२३/ प्र.क्र.११६/विशि-५ दिनांक १७/०८/२०२३ विभागास प्राप्त झाले असून त्यांनी पुढील प्रमाणे कळविले आहे.

"या संदर्भात मला आपणास असे कळविण्याचे निर्देश आहे की, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मतदार यादीतील सर्व कागदपत्रांची सखोल तपासणी होऊनच निवडणूक प्रक्रिया होणे आवश्यक असल्याने कागदपत्रांची सखोल तपासणी करावी व मतदार यादी सुधारित करावी. तो पर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्याबाबत विद्यापीठाने निर्णय घ्यावा. सदरचे निर्देश महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६,मधील कलम ८(७) अन्वये देण्यात येत आहे. "

वरील बाबी लक्षात घेता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

"उपसचिव महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र विभाग मंत्रालय विस्तार मुंबई यांनी त्यांच्या पत्रासोबत संलग्न केलेल्या पत्रात नमूद केलेल्या विसंगतीच्या अनुषंगाने व तदनुषंगीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ८(७) अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मतदार नोंदणी अर्जाची निपक्ष तपासणी करण्यासाठी व मार्गदर्शक सूचना देण्याकरिता समिती गठीत करण्याचे ठरविण्यात आले व पुढील आदेशापर्यंत निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यासंबंधी ठराव एकमताने मान्य करण्यात आला."

हा ठराव आज रोजी मान्य करण्यात आला.

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू